International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Commerce & Economics
Organized by R. V. Belose Education Foundation Dapoli
N. K. Varadkar Arts, R.V. Belose Commerce College, Dapoli
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# भारताच्या अर्थव्यवस्था आणि सेवा क्षेत्रातिल बदलते प्रवाह

**प्रा.संगपवाड डी.एम.**

(अर्थशास्त्र विभाग प्रमुख), सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय, राहिमतपूर, जि. सातारा

**प्रस्तावना,**

सेवा क्षेत्राची भारताच्या जीडीपी मध्ये 55 % या क्षेत्राची हिस्सेदारी दिसते. या वरुन सेवा क्षेत्राचे महत्व दिसून येते. अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी व रोजगार निर्मितीसाठी सेवा क्षेत्र महत्वाची भूमिका बजावत आहे. आईटी आणि आईटीईएस सेवा, आरोग्य सेवा या सारख्या अनेक सेवांचा समावेश होतो.

जगातील महत्वाच्या विकसित अर्थव्यवस्था सेवा क्षेत्रावर आधारित आहे. सेवा क्षेत्रात दुरसंचार, अंतरिक्ष यानातील मापन, कंप्यूटर सॉफ्टवेयर, नागरी विमान वाहतूक आणि शिपिंग व्यवस्थापन, स्थावर मिळकत व्यवसायाचा सुध्दा नव्याने सेवा क्षेत्रातील अंतर्गत समावेश करण्यात आला आहे. याच बरोबर समुदायातील सामाजिक व व्यावसायिक सेवा हॉटेल, रेस्टॉरंट, व्यापार संबंधी सेवांचा समावेश राष्ट्रीय वित्तीय वर्गीकरणामध्ये समावेश केलेला आहे. या सेवा परस्पर समावेशनात येतात.

**विश्वस्तरावर सेवा क्षेत्रातील G.V.A. चे स्थान**

सकल मुल्यवर्धित (**G.V.A.**) हे एक उत्पादकता मेट्रीक आहे जे कॉर्पेरेट उपकंपनी, कंपनी किंवा नगरपालिका उत्पादक क्षेत्र किंवा त्या प्रदेशातील अर्थव्यवस्थेचे योगदान मोजते. यासाठी **G.V.A.** महत्वाचे आहे. कारण ते **G.V.A.** च्या स्तरामध्ये मोजले जाते. जे देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेच्या स्थितीचे एक प्रमुख सुचक आहे.

**जागतिक स्तरावर प्रमुख देशातील सेवाक्षेत्राची सद्यस्थिती :**

| **Country** | **Rank in Group** | **Service GVA(US trillion** | **Services Sector Growth (Percent)** | |
|---|---|---|---|---|
| World | 2017 | 2017 | 2016 | 2017 |
| USA | 1 | 19.5 | 2.0 | 2.2 |
| CHINA | 2 | 12.2 | 7.7 | 8.3 |
| JAPAN | 3 | 4.9 | 0.4 | 0.9 |
| GERMAN Y | 4 | 3.7 | 1.3 | 2.1 |
| UK | 5 | 2.8 | 1.9 | 1.7 |
| FRANCE | 6 | 2.8 | 1.6 | 2.1 |
| INDIA | 7 | 2.8 | 7.5 | 7.9 |

**Source :** UN National Accounts Statistics Database for GDP and GVA

Uno च्या राष्ट्रीय वित्त सांख्यिकी विभागाच्या आकडेवारी नुसार वर्ष 2017 मध्ये भारत जगातील महत्वाच्या पंधरा देशाच्या जीडीपीमध्ये 7 व्या स्थानावर होता. यामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय स्थानावर अमेरिका, चीन आणि जपान हे देश होते.

विश्वस्तरावर वर्षे 2007 ते 2017 मध्ये G.V.A मध्ये सर्वाधिक वृध्दीदरात चीन (8.7%) प्रथम स्थानावर भारत (7.9 %) द्वितीय स्थानावर होता. सेवांच्या निर्यातीच्या बाबतीत (3.8%) या बाबतीत द्वितीय स्थानावर होता. इंग्लंड (4.4 %) प्रथम स्थानावर होता. भारतीय सेवा क्षेत्र हे देश व राज्य पातळीवर उत्पादनात वाढ या व्यापारातील प्रवाह रोजगार पातळीत होणारी वाढ यामुळे आगामी काळात लक्षणीय वाढ होताना दिसत आहे.

भारतातील राष्ट्रीय वित्त सांख्यिकी विभागाच्या अहवालानुसार, चालू किंमत वर्ष 2018-19 नुसार सेवा क्षेत्रातील G.V.A मधील योगदान 54.3% वाढलेले दिसते. वर्ष 2018-19 नुसार स्थावर मालमत्ता व व्यवसायिक सेवामध्ये 7.4 % वृध्दीदर दिसून आला. यामध्ये लक्षणीय वाढ म्हणजे सेवा क्षेत्रातील G.V.A मधील सर्वाधिक

वित्तीय स्थावर मालमत्ता आणि व्यवसायिक सेवांचा एकंदरीत हिस्सा 21.3 % इतका आहे. तर हॉटेल रेस्टॅारंट व्यवसायिक सेवा संबंधी सेवांचा हिस्सा 18.3 % इतका आहे.

- **सेवा क्षेत्रातील रोजगार –**

विश्व बँकेच्या पाहणी अहवालानुसार वर्ष 2007 मध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा 44 % इतका होता. त्यात वाढ होऊन वर्ष 2017 मध्ये तो 51.10 % पर्यंत गेला. रोजगार वाढीमध्ये सेवा क्षेत्राची हिस्सेदारी उच्च स्थरावर होती. भारतात मात्र हे प्रमाण 34% पर्यंत होते. भारताने उदारीकरण, आर्थिक सुधारणांना प्रोत्साहन दिल्यामुळे रोजगाराच्या बाबतीत संरचनात्मक बदल झालेले दिसतात. सन 1993-94 मध्ये रोजगाराचे प्रमाण 61 % वरुन घट होऊन ते सन 2011 -12 मध्ये 37.11 % पर्यंत आलेले दिसून येते. वर्ष 1993- 94 मध्ये रोजगाराचे प्रमाण 16 % वरुन 28.4 % पर्यंत वाढलेले दिसून येते.

- **भारतातील सेवा क्षेत्रातील राज्य स्तरावरील प्रगती –**

भारतात वर्ष 2017-18 या आर्थिक वर्षासाठी (आधारवर्षे 2011-12) (GSVA) मधील हिस्सेदारीमध्ये सर्वोच्च स्थानी दिल्ली 88.9% तर हरियाणा 84.3% इतकी होती. सिक्कीममध्ये (GSVA) मधील हिस्सेदारी सर्वात कमी म्हणजे 30.2% इतकी कमी दिसून आली. वर्ष 2013-17 मधील (GSVA) मध्ये सर्वाधिक सेवा देणा-या राज्यामध्ये तेलंगणा 10.7% तर कर्नाटका आणि हरियाणा 10.5% ही राज्ये सर्वोच्च स्थानी राहिलेली दिसतात. तर सर्वात कमी त्रिपुरा हे राज्य 3.5% इतके कमी वृध्दीदर असलेले दिसून येते.

- **भारतातील काही प्रमुख सेवापुढील आव्हाने –**

भारतातील प्रमुख सेवांचे जीडीपी आणि नियोजन व भविष्याच्या आधारावर वर्गीकरण केलेले दिसते. असंरचना, वित्तीय मध्यस्था आणि सामाजिक क्षेत्रातील सेवांच्या अभ्यासातील तुलनात्मक बदलावर आधारीत पुर्नरावृत्ती होऊ नये याची काळजी घेण्यात आली आहे. यामध्ये व्यापार, पर्यटन, नौवाहन आणि लुप्त होणा-या सेवा, माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा संशोधन व विकास सेवा, कानूनी सेवा व लेखा परिक्षण सेवांचा यात नव्याने समावेश होतो. यातील काही प्रमुख सेवांचा आढावा पुढीलप्रमाणे.

**1. व्यापार सेवा –**

व्यापारी क्षेत्रात सर्व वस्तु व सेवांच्या व्यापाराचा समावेश केलेला असतो. यामध्ये ग्राहक व विक्रेता तसेच दलाला संबंधी व्यवहाराचा समावेश केलेला असतो. भारतातील व्यापार क्षेत्रामध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा 15 ते 17 % पर्यंत वाढलेला दिसून येतो.

**व्यापारी सेवांचा आयात निर्यात करणारे देश (2017)**

| अ.क्र | उच्चस्तरावर निर्यात करणारे देश | वाटा % | उच्चस्तरावर आयात करणारे देश | वाटा % |
|---|---|---|---|---|
| 1. | यू.एस.ए. | 14.4 | यू.एस.ए. | 10.2 |
| 2. | युनाइटेड किंगडम | 6.6 | चीन | 9.1 |
| 3. | जर्मनी | 5.7 | जर्मनी | 6.3 |
| 4. | फ्रान्स | 4.7 | फ्रान्स | 4.7 |
| 5. | चीन | 3.4 | युके | 4.1 |
| 6. | भारत | 3.5 | भारत | 3.0 |
| स्त्रोत : WTO | | | | |

**2. पर्यटन उद्योग – (Tourism Industry)**

आर्थिक विकास व रोजगार निर्मितीमध्ये पर्यटन उद्योगाचे महत्वाचे स्थान आहे. सकल उत्पादनामध्ये व परकीय चलनामध्ये पर्यटन क्षेत्र हे अनेक देशासाठी व्यापाराचे इंजिन म्हणून काम करते. भारतात पर्यटन विकासासाठी सरकारने अनेक प्रयत्न केलेले दिसतात. 163 देशातील नागरिकांसाठी पर्यटन, शिक्षण व आरोग्य संबंधी सुविधेसाठी 3 श्रेणी (ई -व्हिजा) दिला जातो. अनेक चॅनेलवर सन 2017-18 पासून ग्लोबल मिडीया अभियानाची सुरुवात केलेली दिसते. भारतातील (जागतिक वारसा स्थळे) लोकप्रिय बनवण्यासाठी 'The Heritage Trail' भारतातील अंतर्गत पर्यटन वाढण्यासाठी 'देखो अपना देश अभियान' राबविले गेले.

**3. भारतातील आरोग्य आणि चिकित्सा विषयक पर्यटन –**

भारत हा जगामध्ये आरोग्य चिकित्सा पर्यटनासाठी एक महत्वाचा देश म्हणून पुढे येत आहे. वर्ष 2017 मध्ये आरोग्य चिकित्सा पर्यटन संबंधीत व्यापार 2.80 बिलियन डॉलर पर्यंत गेला. वर्ष 2020 मध्ये त्यात वाढ होऊन 9.0 बिलियन डॉलर पर्यंत पोहोचला. जागतिक स्तरावर आरोग्य चिकित्सा पर्यटन उद्योगाचा वाटा 18 % इतका आहे. ही बाब पर्यटन उद्योगासाठी अभिमानाची आहे.

**4. परिवहन संबंधित सेवा –**

भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील एकूण प्रमाणापैकी 95% ते त्याच्या मुल्याच्या 68% व्यापार समुद्री मार्गाने होतो. वर्ष 2016-17 मध्ये भारताने 6 महत्वाच्या बंदरे विकसित करण्याचे काम हाती घेतले. यासाठी सन 2015 मध्ये केंद्र सरकारने 'सागर माला अभियान' सुरु केले. आगामी 10 ते 15 वर्षात 142 बंदरे विकसित करण्यासाठी सरकारने काम सुरु केले. यामध्ये या बंदरांना (SEZ) ला जोडण्याचे लक्ष ठेवले आहे. सन 2016-26 या काळासाठी 4 हजार करोड रुपये बंदर विकासासाठी तरतुद केलेली आहे.

**5. गृह व स्थावर मालमत्ता सेवा –**

स्थावर मालमत्ता आणि गृह सेवा मधील योगदानात नव्याने वाढ होत आहे. भारतात (Real Estate Services and Housing) चे योगदान 7.7 % हे सकल घरेलू उत्पादनात होते. या दोन्ही उद्योगांचे रोजगाराच्या बाबतीत अग्रक्रमाने नाव घेतले जाते. 2013 मध्ये या उद्योगाने 40 मिलियन रोजगार निर्माण केला. 2017 मध्ये त्यात वाढ होऊन तो 52 मिलियन वर पोहोचला. 2022 मध्ये या उद्योगातून 67 मिलियन रोजगार प्राप्त होण्याचा अंदाज व्यक्त केला.

**6. आई. टी आणि बी.पी. एम. संबंधीत सेवा –**

भारतात औद्योगिक आणि व्यवसाय संबंधित सेवांची सुरुवात 1990 च्या दशकात झाली. परंतु वर्षे 2000 मध्ये उद्योग संसाधनाचे नियोजन करणे व उत्पादकता वाढीसाठी सॉफ्टवेअर उपलब्ध करण्याची प्रक्रिया सुरु झाली. आज भारतीय अर्थव्यवस्थेसाठी तो निर्णायक घटक ठरला आहे.

भारताच्या IT- BPN उद्योगासाठी औद्योगिक सेवांचा समावेश होतो. नास्कॉमच्या आकडेवारीनुसार वर्ष 2016-17 मध्ये हा व्यापार 154 बिलियन डॉलरवरुन वर्षे 2017-18 मध्ये 167 बिलियन अमेरिकन डॉलर पर्यंत पोहोचला.

**संदर्भसूची :**

1. Datt /Mahajan : Indian Economy, 2018.
2. Sharma Alakhn : Globalization.& Decent Work and Development in the globalization world,2004.
3. Bhagwati Jagdish : In Defence of globalization, oxford University press-New Delhi, 2004.
4. डॉ.सुखदेव खंदारे : भारतीय अर्थव्यवस्था एज्युकेशन पब्लिकेशन 2013.
5. मिश्रा आणि पुरी, हिमालया पब्लिकेशन, 1997.
6. डॉ. बी.डी. इंगळे, अरुणा प्रकाशन विकास आणि पर्यावरणीय अर्थशास्त्र.
7. शोधगंगावरील विविध लेख.